Hindi

Originally Written in Gujrati language

151.603 (P)

1864 / 12/22

Prabhat-Pheri Pt. IV.

# प्रभात-फेरी

603
Guj

## भाग ४ था.



संग्राहक मुद्रक व प्रकाशकः—पी. बी. पाठक
"श्री पांडुरंग वैभव प्रेस," सुर्यमहाल मुंबई नं. ४
किंमत १ आणा.

RECEIVED
24 AUG. 1931
DEPARTMENT

NATIONAL ARCHIVES LIBRARY
No 603
Date 15-12-71
GOVT. OF INDIA

# प्रभात फेरी संग्रह

# भाग ४ था.

चालः—( आनंद कंद )

प्रभु तूंच एक वाली । आह्मासी याच काळीं ॥ धृ० ॥
परतंत्र हींद माता । स्वातंत्र्य देईं आतां ।
जुलमींच राज्य सत्ता । आह्मा नकोच आतां ॥ १ ॥
आह्मां नकोच कांहीं । परकेंच ते विदेही ।
परकीय पाश सोडी । जुलमीय बंध तोडी ॥ २ ॥
अत्याचरांस आज । सुलतान शाही राज्य ।
अत्याचरींच जुलमी । सरकार दुष्ट कर्मी ॥ ३ ॥
पंजाब लाल गेला । लाठीस भक्ष पडला ।
नेलें जव्हाहीरांसी । केलें तुरुंग वासी ॥ ४ ॥
पेशावरांसी सारा । झडवुन गोळी बारा ।
सोला पुरासी—लाहीं । बेबंद पात् शाही ॥ ५ ॥
जुलमानीं ताडियेलें । किती एक वीर मेले ।

निःशस्त्र हींद वीरां । परकीय मस्त गोरां ॥ ६ ॥
बंदीस्त गांधींजींना । त्रिभुतींच थोर यानां ।
हिसकावुनींच नेलें । होतेंच सर्व गेले ॥ ७ ॥
ऐसे सुपूत्र नेलें । तुरुंगांत डांब्रियेलें ।
अजुनींच शंढ कसलें । परकीय मस्त झालें ॥ ८ ॥
तोडोनीं शृंखलासीं । करूं मुक्त भारतांसी ।
शपताची घ्या तुह्मी तें । स्वातंत्र्य देऊं मातें ॥ ९ ॥
ना खड्ग ढालभाला । निःशस्त्र वीर वाला ।
सत्याग्रहींच शस्त्र । करूं सत्य हेंच अस्त्र ॥ १० ॥
देशार्थीं रक्त देऊं । देशार्थीं प्राण देऊं ।
स्मरूनींच पूर्वजानां । भू देवी मुक्त करण्यां ॥ ११ ॥
प्रभु दावि दावि मार्गा । स्वातंत्र्य देश दुर्गा ।
प्रभुरे स्वतंत्र आम्हां । करशील तूंची केव्हां ॥ १२ ॥
नकोरे नकोच अंत किती। पाहसी अनंत ।
अजि धांव धांव देवा । करी मुक्त हींद जींवां ॥ १३ ॥

दे. य. साम

चाल—( अपने दाता कीं ]

राष्ट्रविभूती गांधी महात्मा । विनवी हींदिजनां ।
भ्याडची बनला भारत पुत्रां । डोळे कां नच उघडीं ।

मायभुमीं हीं दास्यीं रुतलीं कां नच तिजला काढी ॥
दूर देशींचे परकें सोंरें सरकार कुठचें झाले ।
बळजबरीनें सर्व घेऊनी मालक तेंचि बनलें ॥
जखडुनीं मग तें टाकीं तुम्हाला न्यायची म्हणती बारे ।
अजुनी तुह्मी ते स्वस्थची कसलें कळतची नच कां सारें ॥३॥
हींदि जनता उपाशीं मरते लुटती परी परके ।
नेती सर्व ते इथून तिकडे गबरची होती बेटे ॥
दात न याची तुह्मांस परी ती धुंदी असली कसली ।
विदेशी माला बहिष्कार हा सगळे घाला अजुनीं तरीं ॥
परावलंबी जीणें सर्व हे होई कैसे सहनची रे ।
स्वावलंबना मार्ग धरा मग सुज्ञ सांगती सर्वचि रे ॥
चरख्या वरतीं सूत कातुनीं स्वातंत्र्यची ते मिळवा ।
भुकें परि तें मरतिल परकें मार्ग खरा बरवा ॥
चला ऊठा मग सज्जची व्हारे मुक्तची करण्या माता ।
स्वातंत्र्यचि रे तिजला देण्या तयार व्हा आतां ॥

कु. प्रभावती

चालः—( सबसे राम भजन )

परदास्याची निशा संपली जागे कां व्हाना ? ।
पुर्वप्रांतीं स्वातंत्र्याचा रवी हा उदया आला ॥ धृ० ॥

परवशतेची नीजची कसली डोळ्यां तीं तुमच्या ।
स्वातंत्र्याची प्रभा उदेली दाहीं दिशा जागृत झाल्या ॥
परतंत्री हें जिणें तुह्मासी सहन कसें होई बा रें ।
स्वातंत्र्याची ध्वजा उभारा प्रभात समयीं या रे ॥
भेकड सारें तुम्हांस पाहुनीं लुटतीं या काळीं ।
सरसावितीं हे चोरची परकें निर्भयतेनें भारीं ॥
स्वार्थ साधण्या दंडुकशाही परीं ते मग दावितीं ।
अबलांवरीतीं हात टाकिती गुंगी असली कसली ॥
मंगल काळीं अशा प्रभातीं घोरत कसलें पडलां ।
स्वातंत्र्याच्या देवतेस मग मुजरा द्या पहिला ॥
परवशतेच्या निद्रेची मग धुंदी सगळीं झाडा ।
बंधुभगिनींनों उठा मिरवुंया स्वातंत्र्याचा झेंडा ॥

कु. प्रभावती

चाल–( अजि अक्रुर हा )

अजि हींद वीरा ऊठ ! ऊठ ! नीज किती। परवशता पाशची तोडी धृ०
मग शांत कसे बसला तुह्मी अजुनी । झोंप ती कितीही नयनी ? ॥
परदास्य निशा ऊठची आतां सरली । बघ आला स्वातंत्र्य रवी ॥
या दास्यीं अशा कुठवर मग रहाणार । जखडील तुम्हाला फार ॥

व्यापारा म्हणुनी आला ।
लावुनी व्यांप हा असला ।
शिरजोर असा हा बनला ।

लोटुनी धन्या मालक बनला राव । कां करितां त्यांची कींव ॥१॥ धृ०
अजि सूड तरी त्यांचा कां नच घेतां ? । आठवा पूर्वजें आतां ॥
अशि कशी तुम्हां गुलामी गुंगी आली ? । पारतंत्र्य–धुंदी कसलीं !॥
मग जीणें नको परवशतेंचे सारें । नच होई तुम्हां कां रे ? ॥

जा उघडा सारीं पानें ।
इतिहास पूर्वींची गानें ।
सांगेल तुम्हां शौर्यानें ।

किती एक तरीं राज्यें केलीं स्वाहा । हा न्याय कसा तो पाहा ॥२॥
किती अन्यायें वधिलें नंद कुमारा । दाविला न्याय तो कोरा ॥
सन अठराशें सत्तावन मग साला । आठवा तुम्हीं त्या काला ॥
तो वृतांतंचीरे झाशींचा मग पाहीं । स्वातंत्र्या सती ती लढलीं ॥

सुलतानी कर्झन शाहीं ।
पंजाबी डायर दाहीं ।
जुलमाचे राज्यच पाहीं ।

त्या स्वातंत्र्या साठीं लढले वीर । जुलमांचा केला कहर ॥ ३ ॥

गत कालीं कसा होता वैभव शिखरीं । परी अतांच निर्धन भारीं ॥
अजि परकें हे दाविती सारी सत्ता । हरविलीं पूर्वीची वित्ता ॥
मग केली अशी दुष्टची करणीं त्यानें । घेतलें राज्य अदयानें ॥
कापटय जाल पसरून ।
घेतलें सर्व फसवून ।
नच त्यानें रणीं लढवून ।
नच ठेवियलें तुम्हां पाशीं तें काहीं । नेलेंच सर्व हो तेंही ॥ ४ ॥
किती दीन तरीं परदास्यीं रहाणार ? । कां नच रुततें बेडी फार ? ॥
मग तुम्हां कसें सहनची होतें बारें ? । मेंढरे आज तें सारें ॥
तरि अजुनीं कशीं डोळां झापड असलीं । कां नच ये तुम्हा उसळी ?॥
पाजितां दुग्ध सर्पाला ।
उलटाच दंशण्यां फिरला ।
उपकारा तो विस्मरला ।
ना दावी दया परीं असल्या दुष्टांसीं । निर्दळा ठेचुनीं त्यांसी ॥ ५ ॥

दे. य. राम

## तुरुंगवास

प्राप्त झालें कर्मयुग हें, कर्म करण्या सिद्ध व्हा ॥
देश वेंढीला परांनीं, हंसत मरण्या सिद्ध व्हा ॥ १ ॥

रुचत कैशी ही गुलामी, परवशतेच्या शृंखला ॥
काय वाटे धन्यता हो, गाढ कैसे झोपलां ॥ २ ॥
तुरुंगाचें वाटतें भय, मर्द कां हो जाहलां ॥
लाजवीते आजि आम्हां सरोजनीदेवि कमळा ।
धन्यभगिनी धैर्यशाली संकटी उडी घालिते ॥ ३ ॥
वीरकन्या वीरपत्नी वीर माता शोभते ॥
संकटाला तोंड देती, आर्य–भगिनी आपुल्या ॥ ४ ॥
तुरुंगाच्या मार्गि देखा, वीर–कन्या चालल्या ॥ ५ ॥
आर्य–कन्या सिद्ध होतां, स्वस्थ आम्ही बैसतों ॥
धिक् जिणें, हा स्वार्थ धिग् धिग् व्यर्थ तनुही वाहतों
वृद्ध मोतीलाल नेहरू, जाति कारागारिं हो ॥
पाहुनी हें वीर–हृदय, काय बैसे स्वस्थ हो ॥ ७ ॥
शांततेच्या असहकारीं, आत्म--यज्ञाचि पेटतो ॥
पाहूं या हो कोण आधीं, ह्यांत उडी घालितो ॥ ८ ॥

# महात्मा गांधींचा संदेश

परदेशी बहिष्कारा । स्वदेशी प्रेमें स्वीकारा ॥
बहिष्कार राजकीय । शस्त्रासंप्रति हाति धरा ॥
स्वदेशी नौका भरुनी । उतरा स्वराज्य पैलातीरा ॥
असहयोग आचरुनी । सोटेशाही बंद करा ॥
मद्यपान प्रतिबंध करोनी । नीती अवधारा ॥

राष्ट्रिय शिक्षण देऊनि । बनवा राष्ट्रीय संस्कारा ॥
अन्यायाच्या त्या आज्ञेला । मोडूनि झिटकारा ॥
राज्य यंत्र हे बंद पाडण्या । देऊं नका सारा ॥
सैतानी सरकारी नोकऱ्या । नंतर त्याग करा ॥
राम रहिम भक्तानों । बंधु–प्रेमा खास वरा ॥
कुटील राजनीतिला । निस्पृहतेनें धिःकारा ॥
स्वराज्य संपादन सत्कार्यी । लावा हातभारा ॥
राष्ट्रसूत्र धर लोकमान्य बलवंता आज स्मरा ॥
निस्पृहतेनें नरहो । बंदिवासा स्वीकारा ॥
सर्वस्वाला खर्चुनि । आपल्या राष्ट्रा उद्धारा ॥
राष्ट्रप्रेमी सामर्थ्या । देविघ्ने हंतारा ॥

## पद

आलि द्वारीं, अरुण फेरी, ऊठ जनते सत्वरीं ॥ धृ० ॥
नीज रुचली, अजुनी कसली, दास्य सुरी तळपे उरीं ।
स्वाभिमाना, देशप्रेमा, जागवा हो अन्तरीं ॥ १ ॥
आग भडके, पाश अडके, मायदेशा कन्धरीं ।
मायभूमी, परें लुटुनी, गाजविती सत्ता शिरीं ॥ २ ॥
परकि माला, घालि आळा, व्रत स्वदेशी स्वीकरीं ।
राष्ट्रहानी, दारुपानीं, त्यजि सुराती आसुरी ॥ ३ ॥
व्हा स्वतंत्र, राष्ट्रमंत्र, घुमत राहो अंबरीं ।
राष्ट्रप्यारा, ध्वज उभारा, विजयि करुनी संगरीं ॥ ४ ॥

॥ श्रीधन्वन्तरयेनमः ॥

मराठी भाषेंत वैद्यकीचा सचित्र अपूर्व ग्रंथ.

वैद्यराज कृष्णशास्त्री भाटवडेकर कृत.

# वैद्यसार संग्रह.

हा ग्रंथ सर डॉ. भालचंद्र यांचे वडील विद्वान वैद्यराज कृष्णशास्त्री भाटवडेकर, वैद्यराज रघुनाथ शास्त्री दाते व आयुर्वेद महोपाध्याय वासुदेवाचार्य ऐनापुरे यांनी उपयुक्त अनुभविक देशी औषधांची माहिती भरपूर देऊन तयार केला आहे. सर्व रोगांचें निदान, स्त्रीरोग, बालरोग यांची चिकित्सा संगतवार दिली असून उत्तमोत्तम रसायनें, कर्म-विपाक, अनुपान, गर्भाची व इतर माहिती सचित्र असल्यानें देशी औषधांचा लोकमान्य ग्रंथ संग्रहीं अवश्य ठेवून डॉक्टरांची बिलें वांचवा व स्वतःच घरीं वैद्य बना. सवलतीची किंमत रुपये २॥, शिवाय पोष्ट व्ही. पी. खर्च माफ.

## पी. बी. पाठक आणि कंपनी.

वृत्तपत्रएजन्सी, ठाकुरद्वार नाका,

गिरगांव रोड, मुंबई नं. ४.